पुढारी | रविवार, २० मार्च २०२२

रंकाळ्याच्या पाण्याला हिरवा रंग

उन्हामुळे शेवाळाची वाढ; सांडपाणी मिसळल्यास शेवाळ वाढून जलचरांना धोका!

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

रंकाळा तलावातील पाणी सध्या हिरवेगार बनले आहे. तापमानात वाढ होऊन सूर्यकिरणे पाण्यात खोलवर जात असल्याने रंकाळ्यातील फायटो प्लॉनटॉंग या शेवाळाची वाढ होत आहे. या कारणाने सध्या पाणी हिरवे दिसत असून, ही एक नैसर्गिक प्रक्रिया असल्याचे अभ्यासकांनी सांगितले. मात्र, सांडपाणी थेट रंकाळ्यात मिसळल्यास या शेवाळाची मोठ्या प्रमाणात वाढ होऊन जलचरांना धोका पोहोचण्याचीही शक्यता आहे.

पुढारी वॉच

उन्हाळ्यात जसजसे तापमान वाढत जाईल, तसतशी पाण्याची पातळी कमी होण्यास सुरुवात होते. तसेच सूर्यकिरणेही पाण्यात खोलवर पोहोचून पाण्यातील शेवाळ वाढते. रंकाळ्याचे पाणी प्रवाहित नसल्याने या पाण्याला दुर्गंधीही येण्याची शक्यता असते.

पाणी हिरवे दिसणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. रंकाळा तलावाचे पाणी साचून राहात असल्याने यामध्ये अशा शेवाळाची वाढ जोमाने होते. जलचर साखळीला कोणताही धोका न पोहोचविता उन्हाळ्यात हे पाणी सोडून पावसाळ्याचे नवे पाणी साचले तर ही जीवनसाखळी अधिक बळकट होऊन प्रदूषण कमी होण्यास मदत होईल, असे मत विवेकानंद कॉलेजचे पदार्थ विज्ञानविभाग प्रमुख व रंकाळा तलावाचे अभ्यास प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर यांनी व्यक्त केले.



रंकाळा तलावातील हिरवेगार पाणी व साचलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या. (छाया : नाज ट्रेनर)

...तर पाणी राहील स्वच्छ

पाणी निळे असणे म्हणजे पाण्यामध्ये शेवाळ किंवा इतर पदार्थांची घनता कमी असणे. ज्या रंगांची तरंग लांबी ५०० न्यूरोमीटरपेक्षा कमी असते, असे रंग पाण्यामध्ये विखुरले जातात. त्यामुळे पाण्याचा रंग निळसर होत असतो. पण शेवाळाचे अल्प असणारे प्रमाण मानवी हस्तक्षेप, सांडपाणी, कपडे धुणे, गाड्या धुणे यामुळे वाढीस लागते. यामुळे पाणी हिरवे होण्यास सुरुवात होत असते. हे क्लोरोफिलयुक्त शेवाळाचे प्रमाण आहे. मानवी हस्तक्षेप कमी झाला तर हे पाणीदेखील स्वच्छ राहण्यास मदत होईल, असेही डॉ. कारंजकर म्हणाले.

सांडपाणी रोखण्याची गरज

पाण्यातील शेवाळ वाढत गेले तर त्याचा जलचरांच्या श्वसनक्रियेवर परिणाम होतो. पाण्यातील हे शेवाळ त्यांच्या श्वसनामार्गात अडथळा बनले तर त्यांच्या जीविताला धोका निर्माण होतो. हे रोखायचे असेल तर रंकाळ्यात मिसळणारे सांडपाणी रोखण्याची आवश्यकता आहे. हे सांडपाणी शेवाळ वाढीसाठी खताचे काम करू शकते, यामुळे ते रोखले तर शेवाळाची वाढही रोखणे शक्य होईल.